# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ९६-२३ दिनांक :- २३/०३/२०२३

## आर्थिक व्यवहाराच्या वादातुन खून करुन १६ वर्ष फरार असलेल्या आरोपीतांना उत्तराखंड राज्यातीतुन अटक - गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांची कामगिरी.

-------00000-------

दिनांक १३/१२/२००७ रोजी सकाळी ०८.४५ वाजेच्या पुर्वी मुंबई-अहमदाबाद हायवे रोड क्रमांक ८ चे पुर्वेस, गुरुकृपा हॉटेलच्या समोर, कर्नाल पाडा गावाकडे जाणा-या रोडच्या बाजुला अज्ञात आरोपीत यांनी अज्ञात कारणावरुन एक अनोळखी पुरुष वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष यास कोणत्यातरी हत्याराने जिवे ठार मारुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने प्रेत झाडी झुडपात टाकुन दिले म्हणुन फिर्यादी नामे मधुकर सनकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन माणिकपुर पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नंबर ३८०/२००७ भा.द.वि.सं. कलम ३०२, २०१ अन्वये गुन्हा नोंद करणयात आला होता व तपासादम्यान गुन्हयातील मयत इसम याची ओळख संजय विनोद झा, वय ३२ वर्षे, व्यावसाय प्रॉडक्शन मॅनेजर गारमेंट फॅक्टरी, रा. मिरारोड जि. ठाणे असे निष्पन्न झाले होते.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील विविध गंभीर गुन्हयातील पाहिजे व फरार निष्पन्न परंतु नजरेआड असणारे आरोपीत यांचा शोध घेवुन अटक करण्याबाबत वरिष्ठांनी सुचना व मार्गदर्शन केले होते .

वरिष्ठांनी केलेले मार्गदर्शन व सुचनेप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष ३, विरार पथ्कातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीचे आधारे आरोपीत १) पुरणसिंग प्रतापसिंग उन्योनी ऊर्फ पुरणसिंग कापुरसिंग परिहार, वय ४१ वर्षे २) मोहनसिंग प्रतापसिंग उन्योनी ऊर्फ मोहनसिंग कापुरसिंग परिहार, वय ३८ वर्षे, दोन्ही रा. जि. बागेश्वर, राज्य उत्तराखंड यांना दिनांक २०/०३/२०२३ रोजी जि. बागेश्वर, राज्य उत्तराखंड येथुन ताब्यात घेतले होते. नमुद आरोपीत यांचेकडे अधिक तपास केला असता नमुद आरोपीत यांनी त्याचे साथीदारांसोबत गुन्हयातील मयत इसम नामे संजय विनोद झा याचेशी झालेल्या आर्थिक व्यवहाराच्या वादातुन हत्या करुन त्याचा मृतदेह मुंबई-अहमदाबाद हायवे, रोड क्रमांक ८, कर्नाल पाडा गावाकडे जाणा-या रोडच्या बाजुला झुडपात फेकुन दिल्याचे व वर नमुद आरोपीत हे मागील १६ वर्षापासुन उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश येथे आपले अस्तित्व लपवुन राहत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करुन पुढील कारवाई करीता माणिकपुर पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष ३, विरार चे पो.नि. श्री. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मुकेश

तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अंम. राकेश पवार, सुमित जाधव, म.सु.ब. प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम सायबर गुन्‍ यांनी केली आहे.




**------000------**